# मानवतेप्रति प्रेम

## श्रीगुरुमाईंसोबतचे प्रसंग

### श्री मुक्तानंद आश्रम येथे झालेल्या आनंदमय जन्मदिवस २०१७च्या सत्संगांमधून

गुरुमाईंसोबतचा प्रसंग : १

गरिमा बोरवणकर

तो गुरुदेव सिद्धपीठामधील १९८४ सालचा ऑक्टोबर महिना होता. संपूर्ण भारतातून आणि विश्वभरातून हजारो सिद्धयोगी, बाबा मुक्तानंदांच्या महासमाधीच्या सन्मानार्थ आयोजित केलेल्या आध्यात्मिक अभ्यासांमध्ये आणि पवित्र पूजाविधींमध्ये भाग घेण्यासाठी आश्रमात आले होते. गुरुचौक, ज्या सत्संग हॉलला आता हृदयदीप म्हणतात तेथे सात दिवसांचा सप्ताह — अखंड नामसंकीर्तनाचे आयोजन केले गेलेले होते आणि त्याचबरोबरच यज्ञ मंडपात यज्ञकार्यदेखील केले जात होते.

दररोज या पावन सोहळ्यांमध्ये भाग घेण्यासाठी येणाऱ्या साधकांनी भरलेल्या बसेस येत होत्या. सर्व साधकांना सामावून घेता यावे यासाठी तंबूंची एक प्रचंड नगरी आश्रमाच्या मुख्य द्वारासमोरील रस्त्याच्या पलीकडील विस्तीर्ण मैदानावर उभारली गेली होती. तिला चित्रकुट नगरी असे म्हणत असत. चित्रकुट नगरीत असंख्य तंबू होते, आणि त्यातील सर्वात मोठ्या तंबूत जवळजवळ दोनशे लोक राहू शकत.

सप्ताहातील नामसंकीर्तनाचे आनंदमय स्वर वातावरणात संपूर्ण वेळाकरता भरून राहिले होते. एके दिवशी, उत्तररात्री गुरुचौकात सप्ताह सुरू असताना, बरेच लोक रात्र झाल्यामुळे आराम करण्यासाठी परतले होते. आवास-निवासमध्ये म्हणजेच अकॉमॉडेशन् ऑफिसमध्ये काही सेवाकर्त्यांसमवेत मी अजूनही उपस्थित होते. आम्ही नामसंकीर्तन ऐकत आमचे काम पूर्ण करत होतो. अचानक आम्हाला पावसाचा बाहेर होणारा टपटप आवाज ऐकायला आला. आम्ही अविश्वासाने एकमेकांकडे पाहिले. काही आठवड्यांपूर्वीच मान्सूनचा मोसम संपला आहे — जवळपास असाच विचार आम्ही करत होतो. हा पावसाचा हलकासाच शिडकावा असेल अशी आशा करत, आम्ही बाल्कनीकडे पळालो. पण पावसाच्या रिमझिमीतील सातत्य व मिनिटामिनिटाला वाढत जाणारा तिचा जोर पाहून आम्ही चिंतीत

झालो. शेकडो लोक तंबूंमध्ये झोपलेले होते. आमच्या लक्षात आले की, त्या सगळ्यांना विलंब न करता तेथून हलवणे गरजेचे आहे कारण तंबू जलरोधक नव्हते. आम्हाला याचीही जाणीव झाली की या कामात मदतीसाठी आम्हाला बरेच सेवाकर्त्यांची गरज भासेल आणि तीदेखील लवकरात लवकर!

या गोष्टीची चर्चा आम्ही करतच होतो आणि तितक्यात आवास-निवास कार्यालयात गुरुमाईंचे आगमन झाले. त्या म्हणाल्या, “चित्रकुटमध्ये राहणाऱ्या प्रत्येकाला आपण हलवले पाहिजे.” गुरुमाईंनी एका सेवाकर्त्याला कोर्टयार्डमध्ये जाऊन प्रत्येकाला जागा बदलण्याच्या या कामात साहाय्य करण्यास पुढे येण्यासाठी आवाहन करावयास सांगितले.

वेळ न घालवता, आम्ही पटापट कामे करायला सुरूवात केली. ही बातमी सगळीकडे पसरताच अधिकाधिक लोक मदतीसाठी धावून आले. वेगवेगळी कामे करणाऱ्या प्रत्येक गटाला गुरुमाईंनी स्वतः मार्गदर्शन केले. लोकांना आपले सामान गोळा करण्यास मदत करण्यासाठी काही लोक चित्रकुटमध्ये गेले तर इतर काही तंबूंमधून कोरड्या गाद्या एकत्र करण्यास गेले. तर आणखी काही लोक आश्रमात इतस्ततः उपयोगात न आणलेल्या सर्व गाद्या गोळा करण्यासाठी गेले.

गुरुमाईंनी सांगितले की, आम्ही गुरुचौकाच्या खाली असलेल्या इंटेसिव्ह हॉलमध्ये तसेच प्रत्येक निवासी इमारतीतील म्हणजेच मुक्तेश्वर, सिद्धेश्वर, आणि नित्येश्वर यांमधील कॉरीडॉरमध्ये गाद्या घालण्यास सुरुवात करावी. सर्वजण उत्साहाने कामाला लागले आणि त्यांनी आवश्यक असणारे सर्व काही केले. गुरुमाई स्वतः सेवाकर्त्यांबरोबर गाद्या हलवणे आणि त्या कॉरीडॉरमध्ये टाकणे, हे कार्य करीत होत्या.

आता चित्रकुटमधून लोक येण्यास सुरुवात झाली. त्यांना त्यांची नवीन जागा दाखवत असताना, गुरुमाई सगळीकडे फिरून त्यांना ममतेने विचारत होत्या की ते ठीकठाक आहेत का आणि त्यांना आणखी कशाची गरज आहे का.

लोक नमस्कार करण्यासाठी जेव्हा आपले हात जोडत होते आणि कृतज्ञतेने नतमस्तक होत होते, तेव्हा मी पाहात होते की त्यांचे डोळे अश्रुंनी भरलेले होते. आपल्या परमप्रिय गुरू आपल्यासाठी गाद्या उचलून त्या दुसरीकडे टाकत करत आहेत, मध्यरात्रीसारख्या अवेळीदेखील त्या आपली काळजी घेत आहेत हे पाहून, त्यांची हृदये हेलावून गेली. त्यांच्यापैकी प्रत्येकजण गुरुमाईंच्या प्रेमाने आणि गुरुमाईंनी घेतलेल्या त्यांच्याप्रतिच्या काळजीने भावविवश झालेला दिसत होता. गुरुमाईंबद्दलची त्यांची कृतज्ञता आणि भक्ति ही गुरुमाईंच्या त्यांच्यावरील असलेल्या अफाट प्रेमासमानच स्पष्ट रूपात जाणवत होती.

चित्रकुट नगरीच्या अगदी शेवटच्या माणसालादेखील आश्रमात सामावून घेतल्यावर, जे सेवाकर्ते हे सर्व घडवून आणण्यासाठी रात्रभर राबले त्या सर्व सेवाकर्त्यांचे गुरुमाईंनी आभार मानले. गुरुमाईंनी आम्हा सर्वांकडे सुहास्य वदनाने पाहिले आणि प्रेमपुर्वक हात हालवत आमचा निरोप घेत तेथून प्रस्थान केले.

सूर्योदय होण्याची वेळ झाली होती आणि तरीदेखील आम्ही सर्वजण एका अविश्वसनीय शक्तीने भरलेलो होतो, ती शक्ती इतकी उत्साहवर्धक होती की जणू आम्हाला रात्रभराची शांत झोप मिळाली आहे असे वाटत होते. आम्ही कार्यालयात परत गेलो आणि तेथे जाऊन गतरात्रीच्या मृदुतेमध्ये तल्लीन होत शांत बसलो कारण नामसंकीर्तनाच्या सूरावटीच्या तरंगांनी ऑफिसपर्यंचा भाग व्यापून टाकला होता आणि अधिक लोक सप्ताहामध्ये सहभागी झाल्यामुळे नामसंकीर्तन अधिकाधिक शक्तिशाली होत चालले होते. अर्थातच, पाऊस आता थांबला होता, संपूर्ण रात्रभर आमच्यावर प्रेमाचा आणि कृपेचा वर्षाव केल्यानंतर!

गुरुमाईंनी प्रत्येकाला दिलेले ते अफाट प्रेम आणि प्रत्येकाप्रति दाखवलेली ती आस्था यांची मी जशी प्रत्यक्षदर्शी झाले, तशीच गुरूंच्या हृदयकमलाच्या महत्तेची झलक मला मिळाली. असे आहे गुरूंचे स्वरूप — प्रेम का सागर म्हणजेच प्रेमाचा सागर.

गुरुमाईंसोबतचा प्रसंग : २
स्वामी ईश्वरानंद

वर्ष १९८६ मध्ये, गुरुमाईंनी भारताच्या गुजरात राज्यात अध्यापन यात्रेची सुरुवात केली होती. गुरुमाईंनी, सर्व मोठमोठ्या शहरांमधून विशाल सत्संगांचे आयोजन केले, त्यांपैकी प्रत्येक सत्संगात साधक आणि हितचिंतक, हजारोंच्या संख्येने उपस्थित राहत असत. गुरुदेव सिद्धपीठात परत येत असताना, गुरुमाई त्याच मार्गावर असलेल्या एका छोट्या गावात तेथील सिद्धयोग ध्यान केंद्रप्रमुखांच्या आमंत्रणाखातर सत्संगासाठी थांबल्या.

त्या गावात हाताच्या बोटावर मोजता येण्याइतपतच सिद्धयोग विद्यार्थी होते. पण गुरुमाईंच्या भेटीची वार्ता पसरताच, गुरुमाईंचे स्वागत करण्यासाठी मात्र संपूर्ण गाव जमा झाले.

त्यांनी मोठमोठे कापडी फलक आणि फुलांचे हार लावून गावातील मुख्य चौक सजवला तसेच गुरूंचे आसन त्यांनी चौकाच्या मध्यभागी ठेवले, जेणेकरून प्रत्येकाला त्याच्या सभोवती बसावयास जागा मिळेल. गावकऱ्यांनी भरपूर नारळे तोडून आणून ती तयार ठेवली होती, जेणेकरून गुरुमाईंना तसेच त्यांच्या बरोबर यात्रेवर असलेल्या सेवाकर्त्यांना नारळाचे ताजे पाणी देता येईल. भारतामध्ये सन्माननीय अतिथीचे स्वागत करण्याची ही एक पारंपारिक प्रथा आहे.

जेव्हा गुरुमाईंचे आगमन झाले आणि त्यांनी आपले आसन ग्रहण केले, तेव्हा संपूर्ण गाव त्यांच्या सभोवती गोळा झाले. दोन केंद्रप्रमुख, आपल्या गुरूंचे स्वागत करण्यासाठी नारळाच्या पाण्याचा कप घेऊन अतिशय भक्तिभावाने पुढे आले. गुरुमाईंनी स्मित केले आणि त्या म्हणाल्या, "नारळाचे पाणी प्रथम आमच्या स्वामी लोकांना द्यावे." केंद्रप्रमुखांनी होकारार्थी मान डोलावली आणि गुरुमाईंच्या आज्ञेचे पालन केले.

त्यानंतर ते नारळाच्या पाण्याचा दुसरा कप घेऊन गुरुमाईंकडे आले. गुरुमाई म्हणाल्या, "कृपया नारळाचे पाणी सर्वप्रथम एवढ्या लांबवर प्रवास करून आलेल्या सेवाकर्त्यांना द्या." त्या दोन केंद्रप्रमुखांनी होकारार्थी मान डोलावली आणि गुरुमाईंबरोबर आलेल्या प्रत्येक सेवाकर्त्याला नारळाचे पाणी दिले.

नारळाच्या पाण्याचे कप घेऊन केंद्रप्रमुख तिसऱ्यांदा पुन्हा जेव्हा गुरुमाईंकडे परत आले, तेव्हा गुरुमाईंनी त्यांना सांगितले, "या गावकऱ्यांनी कितीतरी सेवा केली आहे. त्यांनाही तहान लागली असेल. तेव्हा कृपया याची खात्री करून घ्या की, प्रत्येकाला नारळपाणी मिळाले आहे." अशा रीतीने सर्व गावकऱ्यांना रूचकर असे कपभरून ताजे नारळपाणी मिळाले.

शेवटी, केंद्रप्रमुख परत आले आणि म्हणाले, "गुरुमाई, प्रत्येकाला नारळपाणी मिळाले आहे. आता आम्हाला ते तुम्हाला अर्पण करावयाचे आहे."

गुरुमाईंनी स्मितहास्य केले आणि त्यांनी नकारार्थी मान डोलावली. त्या म्हणाल्या, "तुम्ही कोणालातरी विसरला आहात." ते दोन केंद्रप्रमुख संभ्रमात पडले. हॉलभर चहुकडे नजर टाकत ते म्हणाले, "आम्ही कोणाला विसरलो आहोत?" गुरुमाई म्हणाल्या, "तुम्ही स्वतःला विसरला आहात. कृपया तुम्हीदेखील कपभर नारळपाण्याचा आनंद घ्या." केंद्रप्रमुखांनी श्रीगुरूंना नमस्कार केला आणि हा गुरुमाईंचा प्रसाद आहे असे समजून त्यांनी नारळाचे पाणी प्राशन केले.

एकदा त्यांनी संपवल्यावर गुरुमाई म्हणाल्या, “आहा! आता सर्वांचे हृदय तृप्त झाल्यामुळे मलाही तृप्त वाटते आहे.”

त्या दिवशी मला श्रीगुरूंच्या हृदयकमलाची झलक अनुभवायला मिळाली !

© २०१८ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.